# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. २३ जून २०२२

### सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ४७० /२०२२ भादंविसक ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि ०४/१२/२००६ ते आजतागायत फिर्यादीच्या सासरच्या घरी |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २२/०६/२०२२ रोजी १७.२२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | शिखा दिपक अहुजा,वय-४० वर्षे, रा- चंडक पार्क,प्लॉट नं १,विजापूर रोड,सोलापूर. |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) दिपक जोगेंदर अहुजा,(पती), २) निलम जोगेंदर अहुजा (सासू), ३) मोनिका प्रसाद टिमके (नणंद), रा- चंडक पार्क,प्लॉट नं १,विजापूर रोड,सोलापूर. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत हे संगमनत करून फिर्यादीस घालून पाडून बोलणे ,शिवीगाळ करणे आरोपी क्र १ याने मारहाण केली व आरोपी क्र २ हि फिर्यादीस तु भिकाऱ्या खानदानची आहे तुझी लायकी नाही तुला चप्पलजवळ ठेवायला पाहिजे तु जास्त नखरे करू नकोस ,घर सोडून तुझ्या माहेरी जा असे फिर्यादीस वारंवार बोलत असे तसेच फिर्यादीच्या जवळच्या नातेवाईकांच्या लग्न कार्यास फिर्यादी पुणे येथे जावून आली असता तिस वरील आरोपीत यांनी घरात घेतले नाही व तुझ्यासाठी दुसरी भाडयाने खोली केली आहे आजपासून तु तेथेच राहयाचे म्हणून आरोपी क्र १ यांनी फिर्यादीस त्या भाडयाच्या खोलीत सोडले व नंतर फिर्यादी ही परत सासरी गेली तर फिर्यादीस पाहून आरोपी क्र २ हिने दारास कुलूप लावून घर बंद करून निघून गेली तसेच फिर्यादीच्या उदरनिर्वाहाची देखील काही जबाबदारी घेण्यास तयार नाही म्हणून. तपास:- पोना/१९६/माडे- |

### सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ४७१ /२०२२ भादंविसक ४९८(अ),३४,अ.जा.अ.ज.अ.कलम ३ (१) (आर) (एस) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि १५/०२/२०२१ ते दि ०७/०३/२०२१ रोजी पर्यत फिर्यादीच्या सासरच्या घरी |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २२/०६/२०२२ रोजी १८.३३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सोनल अतुल बेलखीरे,वय-२७ वर्षे, रा- महात्मा फुले झोपडपट्टी घरनं ५९५, मोदी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) अतुल बेलखीरे (पती), २) वंदीता बेलखीरे (सासू), ३) मोतीचंद बेलखीरे (सासरे), ४) राहुल बेलखीर (दीर) सर्व रा- गोकुळ नगर, इस्त्री कंटिग दुकानाच्या वर पहिल्या मजल्यावर कात्रज,पुणे. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी व आरोपी क्र १ अतुल बेलखीरे हया दोघांना लग्नापुर्वी एकमेकांचे जात माहित होते व दोघांनी ही स्वत:च्या ईच्छेने आंतरजातीय विवाह दि १५/०२/२०२१ रोजी धर्मशास्त्र रितीरिवाजानुसार देहू आळंदी येथे केला व विवाहानंतर फिर्यादी ही सासरी राहण्यास होती त्यांचा विवाहाच्या काही दिवसानंतर विवाह जमवणारे मध्यस्थी श्रीमती कल्पना वेनूर यांनी फिर्यादीच्या सासरी फिर्यादीच्या माहेरकडील जात सांगितले सदर ची जात माहित झाल्यानंतर फिर्यादीचे सासू सासरे व दीर यांनी तु हलक्या जातीची आहे असे म्हणून घरात स्वयंपाक करू देत नव्हते तसेच फिर्यादीस घरातील बाथरूम वापरण्यास न देता तिला बिल्डींगच्या खाली असलेले वॉचमन करीता बांधलेले बाथरूम वापरण्यास भाग पाडत होते.<br>तरी वरील वेळी व ठिकाणी यातील आरोपीत मजकूर यांनी संगनमत करून यातील फिर्यादीस तुझ्या लग्नात माहेरच्यानी आमचा मानपान केला नाही व आमच्या मनाप्रमाणे सोने दिलेले नाहीत , तु हलक्या जातीचे आहेस असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ करून,नाहक मानसिक व शारीरीक त्रास दिला म्हणून. तपास:- सपोआ विभाग-२, सोलापूर शहर - **९४०४३१३०४९** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३१६ /२०२२ भादंविसक २७९,३३७,३३८,मोवाका क १८४/१७७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २०/०६/२०२२ रोजी १३.३० वा. हॉटेल आदित्य समोर सर्वाजनिक रोडवर,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/०६/२०२२ रोजी १७.५८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | संदीप बाबुराव सोनवणे,वय-३५ वर्ष, रा- १७,शांती नगर आयटीआय जवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | मो.सायकल क्र एमएच १३ सीव्ही ९०३२ चा चालक नाव पत्ता माहित नाही |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हा त्याची केटीएम मो.सायकल क्र टीएस ०८ एचके १०१९ यावर जात असताना यातील नमुद आरोपी मजकूर यांनी स्वत:च्या ताब्यातील वरील नमुद क्रमांक असलेली मो.सायकल ही हयगयीने निष्काळजीपणे,अविचाराने,रस्त्याचा अंदाज न घेता चालवून फिर्यादीस व फिर्यादीचा मित्र प्रतिक शिंदे यास धडक देवून जखमी होणेस कारणीभूत झाला आहे म्हणून. तपास:- पोह/११३६/शेख- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ४७२ /२०२२ भादंविसक २८३ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २२/०६/२०२२ रोजी १९.३० वा. चे सुमारास सत्तर फुट रोड,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/०६/२०२२ रोजी २३.२० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोशि/८२५/सचिन शहाजी शिलके,नेम- सदर बझार पो.स्टे सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | राजू विठ्ठल गंजेली,वय-६० वर्षे, रा- घरनं ९०, भारतरत्न इंदिरा नगर सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीत हा त्याचे ताब्यातील चारचाकी हातगाडीवर भजी विक्री करुन रस्त्याने जाणाऱ्या लोकांना अडथळा निर्माण होऊन इजा होईल अशा स्थितीत मिळून आला आहे म्हणून. तपास:- |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३१७/२०२२ भादंविसक १०९, महा.जुगार प्रति का क १२ (अ) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २२/०६/२०२२ रोजी १८.३० वा. जुना विजापूर नाका ते शक्तीदेवी मंदिर झोपडपट्टी नं १ कडे जाणारे रोडवर चौकात कोपऱ्यावर एका पत्राशेडचे आडोशाला,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २२/०६/२०२२ रोजी २३.४० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोकॉ/१४९१/ राजकुमार जीवन पवार,नेम- गुन्हे शाखा,सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सिध्दाराम देवेंद्र सुतार,वय-४५ वर्षे, रा- दत्त मंदिर जवळ ,कुंभार गल्ली शास्त्रीनगर, २) ऋषीकेश राजेंद्र बिराजदार,वय-३२ वर्षे, रा- ६०,राणाप्रतापनगर,नडगिरी पेट्रोल पंपासमोर ,विजापूर रोड,सोलपूर ,३) राहूल बाळासाहेब मेटे रा-डोणगाव ता.उत्तर सोलापूर |
| **मिळाला माल** | | १०,०१०/- रूपये रोख रक्कम व दोन बॉलपेन. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत मजकूर यांनी रस्त्यावरून येणारे जाणारे लोकांकडून पैसे घेवून त्या पैशांवर अंक व आकडयावर पैज लावून मुंबई मेन बाजार नावाचा बेकायदेशीर मटका जुगार खेळवत,सार्वजनिक ठिकाणी लोकांना उपद्रव करताना मिळून आले व त्यास आरोपी क्र ३ याने प्रोत्साहन दिले.म्हणून. तपास:- |